**संजय गांधी निराधार अनुदान योजना व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य योजना जिल्हा आस्थापना वेतन व वेतनेतर खर्चासाठी माहे जानेवारी व फेब्रुवारी ,२०२६ करीता अनुदानाचे वाटप.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: विसयो-२०२५/प्र.क्र.३४/विसयो**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- १८ मार्च, २०२६.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्रविसयो.-२०१८/प्र.क्र.६२/ विसयो, दिनांक २०.०८.२०१९.
२. शासन परिपत्रक ,वित्त विभाग-अर्थसं.क्र ,२०२५.क्र.प्र/४४-अर्थ/३.दि ,०७.०४.२०२५.
३. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्रविसयो.-२०२५.क्र.प्र/३४/ विसयो, दि.१७.०४.२०२५, दि. ०७.०५.२०२५, दि. ०८.०७.२०२५, दि. २२ .०८. २०२५, दि.२७.१०.२०२५ व दि. १६.०१.२०२६.

**शासन निर्णय :-**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी **रु.१४३,७२,७२,०००**/- (रुपये एकशे त्रेचाळीस कोटी बाहत्तर लक्ष बाहत्तर हजार फक्त) व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापनेसाठी **रु.५७,५४,६३,०००**/- (रुपये सत्तावन्न कोटी चौपन्न लक्ष त्रेसष्ठ हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पिय तरतूद मंजूर करण्यात आली आहे. वित्त विभागाने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी **रु. १०९,५७,२३,८३०**/-(रुपये एकशे नऊ कोटी सत्तावन्न लक्ष तेवीस हजार आठशे तीस फक्त) व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापनेसाठी **रु. ४४,२२,०८,२९२**/-(रुपये चव्वेचाळीस कोटी बावीस लक्ष आठ हजार दोनशे ब्याण्णव फक्त) इतका निधी संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये सर्व विभागीय आयुक्त यांना वितरीत करण्यात आला आहे.

आता, वित्त विभागाने मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून ०१-वेतन, ०६- दूरध्वनी, वीज व पाणी, ११-प्रवास खर्च व १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टांसाठी संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी रुपये **रु.२५,७०,५५,१२०/-** (रुपये पंचवीस कोटी सत्तर लक्ष पंचावन्न हजार एकशे वीस फक्त) व वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापनेसाठी **रु.१०,३७,४२,११०/-**(रुपये दहा कोटी सदतीस लक्ष बेचाळीस हजार एकशे दहा फक्त) इतका निधी बिम्स प्रणालीवर वितरीत केला आहे. सदरहू निधी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांना **माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२६** या कालावधीकरीता ०१-वेतन, ०६- दूरध्वनी, वीज व पाणी, ११-प्रवास खर्च व १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टांसाठी या शासन निर्णयान्वये सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२.	सर्व विभागीय आयुक्त यांना कळविण्यात येते की, त्यांनी या सोबत जोडलेल्या विवरणपत्र-अ व ब प्रमाणे वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या अधिपत्याखालील जिल्ह्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार करावे व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील तालुक्यांना अनुदानाचे आवश्यकतेनुसार वाटप करावे.

३.	सदरहू वितरीत अनुदान संजय गांधी निराधार अनुदान योजना जिल्हा आस्थापनेसाठी "मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, जिल्हा प्रशासन ०९३, जिल्हा (०१), सर्वसाधारण आस्थापना" या लेखाशीर्षाखाली आणि वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेच्या खर्चासाठी "मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, इतर प्रशासन ०९४, (०१), इतर आस्थापना, (०१) (०१) वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापना खर्च (२०५३ ११७८)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४.	सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

५.	हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०७.०४.२०२५ अन्वये विभागांना दिलेल्या प्रशासकीय प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३१८११५७०६९७२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIVEK RAMESH SHINDE

Digitally signed by VIVEK RAMESH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA, 2.5.4.20=98222E73B61528CEE875E0CAB75E02437703C365921479FB0198FCF43D79D224, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3D2F2D59501068679DD214122D63CB4D2D18B76F5A89CAE6ECA0162AE6701444, cn=VIVEK RAMESH SHINDE
Date: 2026.03.18 11:58:18 +05'30'

**(विवेक शिंदे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व छत्रपती संभाजीनगर.
२. सर्व जिल्हाधिकारी.
३. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७. वित्त विभाग, अर्थसंकल्प ३, ४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती.

विवरणपत्र- अ

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

शासन निर्णय क्रमांक: विसयो -२०२५/प्र.क्र.३४/विसयो, दिनांक १८ मार्च, २०२६ सोबतचे विवरणपत्र

"मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, जिल्हा प्रशासन ०९३, जिल्हा (०१), सर्वसाधारण आस्थापना"

**माहे जानेवारी व फेब्रुवारी ,२०२६ करीता** अनुदानाचे वाटप.

(रुपये हजारात)

| अ.क्र. | विभागीय आयुक्त | संगणक सांकेतांक | ०१ वेतन | ०६-दूरध्वनी, वीज व पाणी | ११-प्रवास खर्च | १३-कार्यालयीन खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | (०१) (०१) (२०५३ १११३) | ४४००५.५०० | १२२.५०० | ९५.७६० | १०६४.००० | **४५२८७.७६०** |
| २ | कोकण | (०१) (०२) (२०५३ ११२२) | ४२२५७.५२० | २३९.४०० | १६४.०८० | ४६.०४० | **४२७०७.०४०** |
| ३ | नाशिक | (०१) (०३) (२०५३ ११३१) | ४८९१८.२४० | २५२.००० | १७२.५६० | ११४९.१२० | **५०४९१.९२०** |
| ४ | नागपूर | (०१) (०४) (२०५३ ११४२) | ४०२६२.२२० | ३०६.६०० | १५७.४४० | ४६७.७६० | **४११९४.०२०** |
| ५ | अमरावती | (०१) (०५) (२०५३ ११५१) | ४२२४०.६०० | २१८.४०० | १८९.२८० | ७७९.८०० | **४३४२८.०८०** |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | (०१) (०६) (२०५३ ११६९) | ३३३३९.०६० | ३६५.४०० | १९०.७२० | ५१.१२० | **३३९४६.३००** |
| **एकूण** | | | **२५१०२३.१४०** | **१५०४.३००** | **९६९.८४०** | **३५५७.८४०** | **२५७०५५.१२०** |

विवरणपत्र - ब

मागणी क्रमांक एन-२, मुख्य लेखाशीर्ष २०५३, इतर प्रशासन ०९४, (०१), इतर आस्थापना, (०१) (०१) वृध्द भूमीहीन शेतमजुरांना अर्थसहाय्य या योजनेवरील आस्थापना खर्च (२०५३ ११७८)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

**माहे जानेवारी व फेब्रुवारी ,२०२६ करिता** अनुदानाचे वाटप.

(रुपये हजारात)

| अ.क्र. | विभागीय आयुक्त | संगणक सांकेतांक | ०१ वेतन | ०६-दूरध्वनी, वीज व पाणी | ११-प्रवास खर्च | १३-कार्यालयीन खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | (०१) (०१) (२०५३ १११३) | १७१५७.१२० | ७.०५८ | १३.७०७ | ११२.४६६ | **१७२९०.३५१** |
| २ | कोकण | (०१) (०२) (२०५३ ११२२) | १७१५७.१२० | ७.०५८ | १३.७०७ | ११२.४६७ | **१७२९०.३५२** |
| ३ | नाशिक | (०१) (०३) (२०५३ ११३१) | १७१५७.१२० | ७.०५८ | १३.७०७ | ११२.४६६ | **१७२९०.३५१** |
| ४ | नागपूर | (०१) (०४) (२०५३ ११४२) | १७१५७.१२० | ७.०५९ | १३.७०६ | ११२.४६७ | **१७२९०.३५२** |
| ५ | अमरावती | (०१) (०५) (२०५३ ११५१) | १७१५७.१२० | ७.०५९ | १३.७०६ | ११२.४६७ | **१७२९०.३५२** |
| ६ | छत्रपती संभाजीनगर | (०१) (०६) (२०५३ ११६९) | १७१५७.१२० | ७.०५८ | १३.७०७ | ११२.४६७ | **१७२९०.३५२** |
| **एकूण** | | | **१०२९४२.७२०** | **४२.३५०** | **८२.२४०** | **६७४.८००** | **१०३७४२.११०** |

VIVEK RAMESH SHINDE

Digitally signed by VIVEK RAMESH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA, 2.5.4.20=98222E73B61528CEE875E0CAB75E02437703C365921479FB0198FCF43D79D224, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3D2F2D5950106867 9DD214122D63CB4D2D18B76F5A89CAE6ECA0162AE6701444, cn=VIVEK RAMESH SHINDE
Date: 2026.03.18 11:58:36 +05'30'

( विवेक शिंदे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन